# प्रेस नोट

## Github या ओपन सोर्स प्लॅटफॉर्मचा वापर करुन Bulli bai ॲप तयार करुन मुस्लिम महिलांचे आभासी लिलाव करणाऱ्या आरोपीस अटक

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | :— | पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे |
| ०२ | गुन्हा नोंद क्र. व कलम | :— | गु.र.क्र. ०१/२०२२ कलम १५३(अ), (ब), २९५(अ), ५०९, ५००, ३५४(ड) भा.द.वि. सह कलम ६७ मा.त.का. |
| ०३ | फिर्यादी | :— | गोपनिय |
| ०४ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | :— | दि. ०१/०१/२०२२ व त्यापुर्वी |
| ०५ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | :— | दि. ०२/०१/२०२२, वेळ १५.०० वा. |
| ०६ | गुन्हा घडल्याचे ठिकाण | :— | इंटरनेटद्वारे |
| ०७ | अटक आरोपी | :— | ०३ |
| ०८ | तपासी अधिकारी | :— | पोलिस निरीक्षक मौसमी पाटील |

पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे येथे Bulli bai नावाच्या ऑनलाईन ॲपद्वारे मुस्लिम महिलांचा सोशल मिडीयावर त्यांचे फोटो अनैतिक व अश्लिल कारणाकरीता ॲपवर प्रदर्शित करुन आभासी लिलाव होत असल्याची फिर्याद प्राप्त झाली. पिडित महिलेने @bullibai_ , @sage0x11, @hmmaachaniceoki, @jatkhalsa7, @wannabesigmaf या ट्विटर हॅंडल धारकांविरुध्द पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे येथे फिर्यादींच्या व इतर मुस्लिम महिलांच्या बाबतीतील समाजातील इतर घटकांच्या अश्लिल भावना चाळविण्यास अपप्रेरणा मिळाली असुन फिर्यादीच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याने गु.र.क्र. ०१/२०२२ कलम १५३(अ), (ब), २९५(अ), ५०९, ५००, ३५४(ड) भा.द.वि. सह कलम ६७ मा.त.का. हा गुन्हा नोंद करण्यात आला.

सहा महिन्यापुर्वी Sullideals या ॲपद्वारे मुस्लिम महिलांचे फोटो प्रदर्शित करुन आभासी लिलावाद्वारे विक्री करण्याकरिता Github या प्लॅटफॉर्मचा वापर केल्याचे दिसुन आले. त्याच प्रमाणे आता Bulli Bai या ॲपचा वापर करुन वरील प्रमाणेच मुस्लीम महिलांची बदनामी करण्याच्या हेतूने फोटो उपरोक्त नमूद व्टिटर हॅन्डलवरती प्रदर्शित करण्यात आले. @bullibai_ , @sage0x11, @jatkhalsa7, @wannabesigmaf , @jatkhalsa, @Sikh_khalsa11 या व्टिटर हॅन्डल व्दारे या महिलांचे फोटो Bulli bai ॲपवरुन व्टिटरवर शेअर करण्यात आले. ही सर्व ट्विटर हॅन्डल शीख समाजाशी संबंधित असल्याचे भासविण्यात आले आणि @bullibai या ट्विटर हॅन्डलच्या माहितीमध्ये Bulli Bai हे ॲप KSF Khalsa Shikh Force यांनी तयार केल्याचे भासविण्यात आले. Khalasa Supremacist हे Bulli Bai ॲपचे फॉलोअर असल्याचे दिसून आले. Bulli Bai ॲप तयार करण्याकरिताही Github या प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात आला आहे. वर नमुद ट्विटर हॅंडलबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. त्यानुसार कुमार विशाल झा, वय — २१ वर्षे याचा सहभाग दिसुन आला. आरोपी हा दयानंद सागर कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, बॅंगलोर, कर्नाटक येथे सिव्हिल इंजिनियरिंगच्या व्दितीय वर्षात शिक्षण घेत असल्याचे दिसून आले. त्यास चौकशीकामी बोलावून त्याचेकडे चौकशी केली असता त्याचा वर नमुद गुन्हयात सहभाग दिसुन आल्याने त्यास अटक करण्यात आली. आरोपी यास तांत्रिक ज्ञान आहे. त्याद्वारे त्याने मोठया प्रमाणात स्वत:ची ओळख लपवुन ट्विट केली आहेत. ज्यायोगे त्याची सर्च हिस्टरी प्राप्त होणार नाही. सदर अटक आरोपीस मा. न्यायालया समक्ष रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास ७ दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

आरोपी कुमार विशाल याचे Tavasya Vats या युटयूब चॅनेल आहे

@khalsa supermecist या ट्विट्र हॅन्डलवर स्वत:चे लोकेशन कॅनडा दाखवुन स्वत:ची ओळख लपवुन आभासी जगात अनेकवेळा नाव बदलुन ट्विट करीत असल्याचे दिसुन आलेले आहे. आरोपीताकडुन ०१ मोबाईल, ०२ सिमकार्ड व ०१ लॅपटॉप संगणक हस्तगत करण्यात आलेले आहेत.

गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करण्याकरिता एक पथक रुद्रपुर, उत्तराखंड येथे रवाना झाले होते. तपासामध्ये आरोपी नामे स्वेता अनंत सिंह, वय १८ वर्षे हीचा सहभाग निष्पन्न झाला. सदर आरोपींना अटक करण्यात आली असुन तिला मा. न्यायालयाने ५ दिवसांचे ट्रांझिट रिमांड दिले आहे. त्यानंतर आरोपी नामे अणि आरोपी नामे मयंक प्रदिपसिंह रावत, वय २१ वर्षे याचाही सहभाग दिसून आला. सदर आरोपीसही अटक करण्यात आली असून त्याचे ट्रांझिट रिमांड घेण्याची प्रक्रीया सुरु आहे.

आरोपींनी तयार कलेले व्टिटर अकाउंटमध्ये ते शीख धर्मियांनी तयार केलेले आहेत असे भासवण्याकरिता शीख धर्मियांशी संबंधित शब्दांचा वापर केला असूम मुस्लीम महिलांना टार्गेट केलेले आहे. त्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होवून सार्वजनिक शांततेस बाधा येण्याची शक्यता होती. आरोपींना वेळीच अटक केल्याने अशा प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमार्ण होण्यास प्रतिबंध झालेला आहे.